नि.दि.दा.क्र.१०१/२०१८
नि.क्र.१९३

<u>पुढील सरतपास प्रतिवादी क्र.१ करीता विधीज्ञ श्री. एम.पी. गवारे यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -

१. मी प्रतिवादी क्र.१ कार्यालयात माहे नोव्हेंबर-२०२४ पासून नगर अभियंता या पदावर कार्यरत आहे. मी सध्या प्रतिवादी क्र.१ कार्यालयातील अतिक्रमण विभागाचा प्रमुख म्हणून कामकाज पाहतो. आता मला नि.क्र.१९१/१ व नि.क्र.१९१/२ वरील दस्त दाखविले असता त्यातील मजकुर मी सोबत आणलेल्या कार्यालयीन अभिलेखाप्रमाणे खरा व बरोबर आहे. (या क्षणाला वादीचे विधिज्ञ श्री.काळे यांनी साक्षीदाराने जे कार्यालयीन अभिलेख आणलेले आहे ते दोन्ही नि.क्र.१९१/१ व नि.क्र.१९१/२ वरील दस्ताच्या प्रती असून त्या कार्यालयीन प्रती नाही आणि साक्षीदाराने आणलेल्या प्रतींवर प्रतिवादी क्र.१ यांच्या कार्यालयाचा मुळ शिक्का आणि संबंधित दस्तावर तत्कालीन अधिका-याच्या मुळ सहया नसल्याचे सांगितले. साक्षीदाराकडून त्यांनी सोबत आणलेले अभिलेख तपासून पाहिले असता ते दस्त नि.क्र.१९१/१ व नि.क्र.१९१/२ वरील दस्तांच्या प्रती असल्याचे आढळून आले. कार्यालयीन प्रतींवर देखील शासकिय कार्यालयाचा शिक्का असतो आणि सही करणा-याची मुळ सही असते. मुळ दस्त जरी विरोधी पक्षाला देण्यात आला असला तरी कार्यालयीन प्रतींवर मात्र शासकिय कार्यालयाचा शिक्का आणि मुळ सही असणे आवश्यक असते. त्यामुळे नि.क्र.१९१/१ व नि.क्र.१९१/२ वरील दस्तांना निशाणी क्रमांक देता येणार नाही.)

२. आता मला नि.क्र.१९१/३ वरील दि.२४/११/२०१५ रोजीच्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखविली असता त्यातील मजकूर मी सोबत आणलेल्या अभिलेखावरील त्या नोटीसच्या प्रतप्रमाणे खरे व बरोबर आहे. त्यावर प्रतिवादी क्र.१ यांच्या कार्यालयाचा शिक्का व तत्कालीन मुख्याधिकारी यांची सही आहे. सदर नोटीस **<u>नि.क्र.१९६</u>** वर आहे. आता मला नि.क्र.१९१/४ वरील दि.०९/१२/२०१५ रोजीच्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखविली असता त्यातील मजकूर मी सोबत आणलेल्या अभिलेखावरील त्या नोटीसच्या प्रतप्रमाणे खरे व बरोबर आहे. त्यावर प्रतिवादी क्र.१ यांच्या कार्यालयाचा शिक्का व तत्कालीन मुख्याधिकारी यांची सही आहे. सदर नोटीस **<u>नि.क्र.१९७</u>** वर आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२ करीता विधिज्ञ श्री.दिलीप औताडे यांनी नाकारला.</u>**

**<u>उलटतपास वादी करीता विधिज्ञ श्री. काळे यांच्यावतीने सुरु-</u>**

३. माझी नेमणूक शासनाकडून झालेली आहे. श्रीरामपूर येथे माझी पहिली नेमणूक आहे. मी नगर अभियंता म्हणून नेमणूकीस आहे आणि सध्या मी अतिक्रमण विभागाचा प्रमुख आहे हे दाखविण्याकरीता मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हा दावा कोणी कोणाविरुध्द दाखल केला या बाबत मला माहिती नाही. दावा मिळकतीच्या तपशीलाबाबत मला माहिती नाही. २०१५ पूर्वी दावा मिळकतीवरील बांधकामाची काय परिस्थिती होती या बाबत मला माहिती आहे.

४. प्रतिवादी क्र.१ या कार्यालयाच्या वतीने साक्ष देण्यासंबंधी मला मुख्याधिकारी यांनी लेखी पध्दतीने प्राधिकृत केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती संदर्भात प्रतिवादी क्र.१ यांच्या वकीलांनी मला त्यांच्या कार्यालयात बोलावून घेतले होते. दावा मिळकती संदर्भाची माहिती मला आमच्या कार्यालयामार्फत न्यायालयाचे कामकाज पाहणारे श्री.ज्ञानेश्वर छल्लारे, लिपीक, कोर्ट विभाग यांनी दिली. श्री.ज्ञानेश्वर छल्लारे, लिपीक, कोर्ट विभाग यांनी मला तोंडी माहिती दिली. श्री.ज्ञानेश्वर छल्लारे, लिपीक, कोर्ट विभाग यांनी मला दावा मिळकतीवरील बांधकामा बाबत माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, श्री.ज्ञानेश्वर छल्लारे, लिपीक, कोर्ट विभाग यांच्याकडे दावा मिळकती संदर्भाचे संपूर्ण अभिलेख आहे.

५. दावा मिळकतीवरील अनाधिकृत बांधकामाबाबतची माहिती मी नि.क्र.१९६ व नि.क्र.१९७ वरील नोटीसीप्रमाणे घेतली. दावा मिळकतीवरील बांधकामाबाबत नोंदविण्यात आलेले जबाब, तयार करण्यात आलेल्या पंचनाम्याबाबत मी माहिती घेतली नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीवरील अनाधिकृत बांधकामाबाबत पंचनामे तयार करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते पंचनामे मी आजरोजी दाखल केले नाही. ते पंचनामे कोणी तयार केले त्या बाबत मी माहिती घेतली नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९६ व नि.क्र.१९७ वरील नोटीसींवर पोहोच म्हणून वादीची सही नाही.

**<u>प्रश्न</u>** - दावा मिळकतीवरील बांधकामा संदर्भात प्रतिवादी क्र.१ कार्यालयाने दि.०१/१२/१९८७ रोजी बांधकाम परवानगी दिली होती ?

**उत्तर** - तो नगररचना विभागाचा विषय असल्याने त्या बाबतीत मला सांगता येणार नाही.

**प्रश्न** – तुम्ही तुमच्या सरतपासात "दावा मिळकतीत वादी यांनी अनाधिकृत बांधकाम केलेले आहे." हे तुम्ही कश्याच्या आधारे लिहिले ?

**उत्तर** - सन २०१३ व २०१५ मध्ये दिलेल्या नोटीसींच्या आधारे मी असे नमूद केले आहे.

हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९६ व नि.क्र.१९७ वरील नोटीसींमध्ये अनाधिकृत बांधकाम केल्याबाबतचा कुठेही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९६ व नि.क्र.१९७ वरील नोटीसींमध्ये "श्रीरामपूर नगरपरिषदेने वादीच्या बांधकाम आराखडयास मंजूरी दिलेली नाही" असा कुठेही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९६ व नि.क्र.१९७ वरील नोटीसींमध्ये "मुळातःच वादीने अनाधिकृत बांधकाम केल्यानंतर बांधकामाचा आराखडा दाखल केलेला आहे आणि वादी व त्याच्या इतर कुटूंब घटकामार्फत मागितलेली बांधकाम परवानगी देखील न.प. ने नाकारलेली आहे" असा कुठेही उल्लेख नाही.

७. आता मला नि.क्र.१८१/२ वरील नोटीसची प्रत दाखविली असता ती नोटीस देखील दि.२४/११/२०१५ रोजीची आहे. (सदर दस्तास **नि.क्र.१९८** देण्यात आले.) हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१९६ व नि.क्र.१९८ वरील हस्ताक्षरामध्ये फरक आहे. माझ्या पुराव्याचे शपथपत्र कुठे टंकलिखीत करण्यात आले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आज पहिल्यांदा साक्षकरीता न्यायालयात आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्यात काय टंकलिखीत करायचे या बाबतची माहिती मी दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुराव्यातील मसूदा टंकलिखीत करतांना मी त्या ठिकाणी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्यातील मजकूर वकीलांनी माझ्या माहिती व संमतीशिवाय तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात माझी साक्ष नोंदविण्यापूर्वी कोण-कोणते कागदपत्र दाखल करण्यात आले या बाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नगर अभियंता या पदावर कार्यरत आहे आणि आजरोजी अतिक्रमण विभागाचा प्रमुख आहे हे मी खोटे सांगतो.

**प्रश्न** - नगर परिषदेच्या वतीने साक्ष देण्याकरीता नगर परिषदेने तुम्हाला अधिकार दिलेले नाही ?

**उत्तर** - नगर अभियंता या नात्याने माझी जबाबदारी आहे.

हे म्हणणे खरे नाही की, वादीने अनाधिकृत बांधकाम केल्याचे व त्या अनुषगांने प्रतिवादी क्र.१ यांनी वादीस वेळोवेळी नोटीसा दिल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपसातील संपूर्ण मजकुराचे मी खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीबाबत काहीही माहिती नसतांना मी पुराव्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHISH BIHARILAL MARLECHA

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2026.03.12 10:40:29 +0530

(आशिष बि. मरलेचा)

दिनांक ११/०३/२०२६

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीरामपुर, जि.अहमदनगर